# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
२५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी- २०१८-१९/२०१८/5116 दिनांक : ३०/११/२०१८

प्रति

प्राचार्य/ संचालक,

सोबत जोडलेल्या यादीमधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणीची व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया.....

संदर्भ : १. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकारण, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/प्र.क्र १७०/प्र. नि.प्रा/प्र.प्र.का/१२२/२०१८ दिनांक ०५/०९/२०१८.

२. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१८/१५३० दिनांक २८/११/२०१८

३. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकारण, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र. प का/१६६२/२०१८ दिनांक २६/११/२०१८.

४. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकारण, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र. प का/२८५/२०१८ दिनांक २९/११/२०१८.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया संपूर्ण ऑनलाइन पध्दतीने राबविण्यात येणार असल्याचे प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी त्यांच्या दिनांक ०५/०९/२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने या पूर्वी कळविलेले आहे. त्यानुसार **www.safalata.org** या संकेतस्थळावर नोंदणी करण्याच्या सुचना देखील आपणास देण्यात आलेल्या आहेत.

नोदणी करण्यासाठी प्राधिकारणाकडून दिनांक १०/१०/२०१८ ते १४/१०/२०१८ व दिनांक ०१/११/२०१८ ते ०५/११/२०१८ अशी मुदतवाढ देण्यात आली होती. तदनंतर दिनांक १६/११/२०१८ ते १९/११/२०१८ या कालावधीत विलंब शुल्कासहित नोंदणी करण्यासाठी देखील मुदतवाढ देण्यात आली होती. तरी देखील काही संस्था/ महाविद्यलयांनी नोंदणी कलेली नसून त्याची यादी संदर्भ क्र ३ चे पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर यादीमधील या विभागीय कार्यालय अंतर्गत संस्थांची वेगळी यादी करुन सोबत जोडलेली आहे. ज्या संस्थांनी नोंदणी केली नाही अशा संस्थेमधील प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही तसेच मान्यतेअभावी सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास याची सर्व जबाबदारी संबंधित संस्था / महाविद्यालयाची असे असेही प्राधिकरणाने कळविलेले आहे.

**आता उपरोक्त संदर्भ पत्र क्र ४ व्दारे मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकारण, यांनी ज्या संस्था/ महाविद्यालयांचे नोदणी करण्याचे राहून गेले असेल अशा संस्था/ महाविद्यालयांकरीता एक अंतिम मुदत म्हणून दिनांक ०१/१२/२०१८ ते ०५/१२/२०१८ पर्यत नोंदणी करीता www.safalata.org हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शासकीय / अनुदानित संस्थांना विनाविलंब शुल्क नोंदणीची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे तथापी खाजगी विनाअनुदानित संस्थाकरीता प्रति विद्यार्थी रुपये २०००/- व कमाल रुपये ५०,०००/- इतका विलंबशुल्क भरुन नोदणी करता येईल.**

**सोबत जोडलेल्या यादी मधील संस्थाना कळविण्यात येते की ज्या संस्था नोंदणी करणार नाहीत अशा संस्थेमधील प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही तसेच मान्यतेअभावी सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास याची सर्व जबाबदारी संबंधित संस्था / महाविद्यालयाची राहील याची सर्व संबधीत संस्थांनी नोंद घ्यावी.**

1/1/2019

प्र सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

| | B ARCHITECTURE | ADMITTED CANDIDATES |
|---|---|---|
| 6009 | B.K.P.S. College of Architecture, Pune | 20 |
| 6912 | Flora College of Architecture, Khopi | 32 |
| | **B. PHARMACY** | |
| 6008 | Government College of Pharmacy, Karad | 59 |
| 6652 | Poona College Of Pharmacy, Erandwane, Pune | 58 |
| | **DIRECT SECOND YEAR ENGINEERING** | |
| 6004 | Government College of Engineering & Research, Avasari Khurd | 119 |
| 6005 | Government College of Engineering, Karad | 70 |
| 6006 | College of Engineering, Pune | 118 |
| 6007 | Walchand College of Engineering, Sangli | 86 |
| 6622 | I.S.B.& M. School of Technology, Nande Village | 168 |
| 6767 | Suman Ramesh Tulsiani Technical Campus: Faculty of Engineering, Kamshet,Pune. | 32 |
| 6771 | Flora Institute of Technology, Khopi, Near Khed Shivapur Toll Plaza, Pune | 26 |
| 6808 | Keystone School of Engineering, Pune | 82 |
| | **DIRECT SECOND YEAR PHARMACY** | |
| 6008 | Government College of Pharmacy, Karad | 18 |
| 6383 | Kasturi Shikshan Sansthas College of Pharmacy, Shikrapur | 12 |
| 6652 | Poona College Of Pharmacy, Erandwane, Pune | 6 |
| | **M. ENGINEERING/ M.TECH** | |
| 6005 | Government College of Engineering, Karad | 97 |
| 6006 | College of Engineering, Pune | 427 |
| 6007 | Walchand College of Engineering, Sangli | 214 |
| 6269 | Shetkari Shikshan Mandal's Pad. Vasantraodada Patil Institute of Technology, Budhgaon, Sangli | 55 |
| 6732 | Dr. D. Y. Patil School OF Engineering, Lohegaon, Pune | 39 |
| 6771 | Flora Institute of Technology, Khopi, Near Khed Shivapur Toll Plaza, Pune | 15 |
| 6881 | Army Institute of Technology, Pune | 6 |
| | **M PHARMACY** | |
| 6008 | Government College of Pharmacy, Karad | 20 |
| | **MBA/MMS** | |
| 6002 | Department of Commerce & Management, Shivaji University, Kolhapur | 45 |
| | **MCA** | |
| 6005 | Government College of Engineering, Karad | 26 |
| 6029 | Yashwantrao Chavan School of Rural Development, Kolhapur | 22 |
| 6031 | Solapur University, Solapur | 20 |

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१
दूरध्वनी : ०२२ – २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्र. संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र.प.का/२८५/ २०१८ दिनांक : २९/११/२०१८

प्रति,

संचालक तथा नोडल अधिकारी,
वैद्यकीय शिक्षण/तंत्रशिक्षण/उच्चशिक्षण
आयुष/कला/कृषी/माफसू

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याबाबत.**
**संदर्भ :- दि.२९/११/२०१८ रोजी प्रवेश नियामक प्राधिकरणाची बैठक वि.क्र. ७ (A)**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरीता नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर प्रक्रियेदरम्यान ज्या संस्था/ महाविद्यालयांचे नोंदणी करण्याचे राहून गेले असेल अशा संस्था/ महाविद्यालयांकरीता एक अंतिम मुदत देऊन दि.०१/१२/२०१८ ते दि.०५/१२/२०१८ पर्यत नोंदणी करीता **www.safalta.org** हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. शासकीय/अनुदानित संस्थांना विना विलंबशुल्क नोंदणीची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि खाजगी विनाअनुदानित संस्थांकरीता प्रति विद्यार्थी रु.२,०००/- व कमाल रु.५०,०००/- इतका विलंबशुल्क भरुन नोंदणी करता येईल.

नोंदणी न झालेल्या संस्थांची यादी यापूर्वीच आपणाला पाठविण्यात आली आहे, तरी अशा संस्था/महाविद्यालयांना त्वरित नोंदणी करण्याच्या सूचना आपल्या स्तरावर करण्यात याव्यात. या नंतरही जर खाजगी/ विनाअनुदानित संस्थांनी नोंदणी करण्यास चुकारपणा दाखविल्यास अशा संस्था/ महाविद्यालयांतील प्रवेशीत विद्यार्थ्यांना मान्यता देण्यात येणार नाही. तसेच विना नोंदणी शासकीय/ अनुदानीत संस्थांची माहिति शासनाकडे पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

श्री कुंजीर सहा संचालक (तं.)

30.11.18

(आ.ए.रायते) भा.प्र.से.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई

D:\rutuja\Rutuja\Malekar Sir\kalp tech\date extended tech 29-11-2018.docx